# 'आपत्ती व्यवस्थापन' जनजागृती

मुंबई : टाटा पॉवर क्लब एनर्जीच्या विद्यार्थ्यांनी क्विन मेरी स्कूलच्या सहकार्याने चेशायर होमच्या अपंग विद्यार्थ्यांसाठी 'आपत्ती व्यवस्थापन' या विषयावर जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन केले होते. आग पसरणे, रस्ता अपघात, नैसर्गिक आपत्ती यासारख्या संकटाचा सामना करण्याचे शिक्षण विद्यार्थ्यांना देण्यासाठी क्विन मेरी स्कूलच्या विद्यार्थ्यांनी चेशायर होमला भेट दिली होती. संकटांचा सामना कसा करता येईल, याची प्रात्यक्षिके यावेळी समजावून सांगण्यात आली. क्विन मेरी स्कूलच्या जवळपास ३५ विद्यार्थ्यांनी तसेच क्लब एनर्जीच्या १५ स्वयंसेवकांनी या उपक्रमात भाग घेतला.